पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 10/01/2019 (गुरूवार)
(सकाळ)

---

## कोळसा चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 07 कि.मी अंतरावर एनएच– 7 महामार्ग रोडच्या बाजुला डुमरी येथे दिनांक 09/01/2019 चे 18:30 वा. ते 19:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संतोष इंद्रसेन यादव (डब्लु.सी.एल. सेक्युरिटी गार्ड), वय 55 वर्षे, रा. डुमरी कन्हान यांना मिळालेल्या माहिती वरून घटनास्थळावर जावुन पाहणी केली असता तेथे अंदाजे 3 टन कोळसा कि. 7,500/–रू. चा मुद्देमाल पडलेला होता. सदर मालाबाबत आरोपी नामे– 1) सुखलाल बिसराम पटेल, वय 55 वर्ष, रा. डुमरी, कन्हान व 2) गणेश नथ्थुलाल यादव, वय 60 वर्ष, रा. कामठी यांनी कोणतेही कागदपत्र सादर न केल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र चौधरी हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर मौजा डोरली येथे दिनांक 09/01/2019 चे 16:30 वा. दरम्यान फिर्यादीचा आतेभाऊ व आरोपी क्र. 1) सुनिल मेश्राम हे एकाच वर्गात शिकत आहे. आरोपी क्र. 1) हा नेहमी फिर्यादीचा आतेभाऊ यास मारपीट करत राहतो. याबाबत पो.स्टे खापरखेडा येथे तक्रार केली असुन या कारणावरून आरोपी क्र.1 व त्याचे सोबती 2) सुरज वानखेडे, 3) मयुर निकोसे, सर्व रा. हिंगणा यांनी संगणमत करून फिर्यादी व त्याचे मित्रांना हातबुक्याने व विटेने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मुकुल भानुदास पाटील, वय 22 वर्ष, रा. डोरली यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार दिलीप आगरकर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर